**दिल दोस्ती**
Forever Friends

# विद्यापीठात जापनीज संस्कृतीचा मेळा

सचिन लोंढे
सीसीआर, शिवाजी विद्यापीठ

मानवी संस्कृती टिकवून ठेवण्याकरिता भाषा महत्त्वाची भूमिका बजावत असते. आज सबंध जगभरात अनेक देशांमध्ये विविध भाषा आपले अस्तित्व टिकवून आहेत. या देशाविषयी, तिथल्या लोकांविषयी, तिथल्या समाजजीवनाविषयी आणि महत्त्वाचं म्हणजे तिथल्या संस्कृतीविषयी आपणास जाणून घ्यायचं असेल तर त्या देशाची प्रमुख भाषा आपणास अवगत असं आवश्यक आहे. भाषेचं हे ज्ञान आताच्या आधुनिक युगात फक्त संस्कृती जाणून घेण्याविषयी मर्यादित न राहता याच भाषेच्या ज्ञानाचा वापर आपले उज्वल भविष्य निर्माण करण्याकरिता कसा होईल, यासाठी शिवाजी विद्यापीठाचा परदेशी भाषा विभाग नेहमीच प्रयत्नशील असतो.

नियमित अभ्यासक्रमाशिवाय विद्यार्थ्यांना त्या भाषेच्या अधिक जवळ घेऊन जाण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या परदेशी भाषा विभागातर्फे विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.






याच उपक्रमाचा एक भाग म्हणून जपानी भाषेविषयीची कार्यशाळा व जपानी संस्कृतीचे विविध पैलू उलगडणून दाखविण्यासाठी प्रदर्शन यांचे आयोजन करण्यात आले होते.

विविधतेमध्ये एकता असणाऱ्या भारतात आजच्या घडीला अनेक भाषा बोलल्या जातात. मात्र जेव्हा आपण नोकरीच्या शोधार्थ देशाच्या सीमा ओलांडतो तेव्हा मात्र आपणास आपल्या इंग्रजीखेरीज ज्या देशात आपण जात आहोत त्या देशाची मुख्य भाषा अवगत असणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. आज विविध क्षेत्रात परदेशात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध असताना फक्त भाषेच्या ज्ञानाअभावी अनेक विद्यार्थी संधीपासून वंचित राहतात. मात्र ज्यावेळी आपल्याकडे एखाद्या भाषेचे अधिकचे ज्ञान असते तेव्हा मात्र संधीची कित्येक दारे आपणासाठी खुली होतात.

या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी ओरिगामी पद्धतीने स्वतः बनवलेली कागदी कलावस्तु,जपानी ध्वज, प्रतिकात्मक सांस्कृतिक वस्तु, चित्रमय बालकथांची पुस्तके, जपानी पंखे, कॅलिग्राफी, भित्तीपत्रे अशा विविध जपानी वस्तु या प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या. या प्रदर्शनातून जपानी संस्कृतीचे अनेक पैलु विद्यार्थ्यांना समजण्यास मदत झाली.

आज जगभरातील अनेक नामवंत कंपन्यांमध्ये जपानी कंपन्यांची नावे आघाडीवर आहेत. त्यामुळेच विद्यार्थ्यांना या भाषेचा उपयोग करून आपले भविष्य उज्वल करता येऊ शकते. अभियांत्रिकीचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना तांत्रिक बाबींमध्ये अशा कंपन्यांमध्ये जपानी भाषेच्या ज्ञानामुळे पहिला संधी मिळते. याचसोबत अनुवादक म्हणून आज कला शाखेचे कित्येक विद्यार्थी चांगल्या पगारावर आपल काम करताना पाहायला मिळत आहेत.




“

जपानी भाषा विभागामार्फत एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकविला जातो. जपानी भाषेत करिअरच्या अनेक संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. जपानी भाषा शिकल्यानंतर त्याच्या काही परीक्षा जगभरात एकाच दिवशी घेतल्या जातात. जेएलपीटी (जापनीज लँग्वेज प्रोफिशिअन्सी टेस्ट )या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या परीक्षेचे पाच टप्पे आहेत. आम्ही शिकवत असणारा प्रमाणपत्र अभ्यस्क्रम हा या परीक्षेच्या पहिल्या टप्प्याच्या दृष्टीने फायदेशीर ठरतो.

– स्नेहल शेटे,
जपानी भाषा शिक्षिका

परदेशी भाषा विभागामार्फत आम्ही नेहमीच नवनवीन व विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान कसे मिळेल, यासाठी प्रयत्न करत असतो. जपानी संस्कृतीविषयीचे हे प्रदर्शन हा त्याचाच एक भाग आहे. आज परदेशी भाषा विभागात रशियन, जर्मन आणि जपानी या तीन भाषांचे अभ्यासक्रम चालविले जातात. येत्या काळात पोर्तुगीज आणि फ्रेंच या भाषांचे अभ्यासक्रम चालविण्याचा आमचा मानस आहे. यातून नोकरीच्या चांगल्या संधी मिळतील.

– डॉ मेघा पानसरे, अधिविभाग प्रमुख, परदेशी भाषा विभाग




इचलकरंजीत नाईट कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात डॉ. डी. आर. मोरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. पुरंधर नारे, अरुण खंजिरे उपस्थित होते.

# कामगारांच्या शैक्षणिक विकासात खंजिरे कुटुंबीयांचे योगदान : मोरे

लोकमत न्यूज नेटवर्क

**इचलकरंजी** : येथील सामाजिक, राजकीय क्षेत्रासोबत कामगारांच्या शैक्षणिक विकासामध्ये खंजिरे कुटुंबीयांनी मोलाचे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांनी केले.

ते देशभक्त बाबासाहेब खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाईट कॉलेजमध्ये आयोजित बाबासाहेब खंजिरे, सरोजिनीताई खंजिरे व प्रकाश खंजिरे यांच्या संयुक्त स्मृती उजाळ्याच्या कार्यक्रमानिमित्त बोलत होते.

प्रा. मोरे म्हणाले, सद्या निकालाची टक्केवारी कशी वाढेल याची स्पर्धा सुरु आहे. नोकरी, प्रमाणपत्र, शिक्षण व्यवस्था नसून ती गुणात्मक करण्याचे आव्हान सर्वांसमोर उभे आहे. अध्यक्षस्थानी प्रकाश आवाडे होते. त्यांनी वर्तमान स्थितीवर प्रकाश टाकून निष्ठावंत लोकांची आजही समाजास गरज असल्याचे सांगितले. संस्थेच्या विकासासाठी सर्वांनी मिळून सहकार्य करण्याची ग्वाही त्यांनी दिली. यानिमित्ताने आधार ब्लड बँकच्या सहाय्याने रक्तदान शिबीराचे आयोजन केले. स्वागत प्राचार्य डॉ. पुरंधर नारे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. एम. आर. दांडेकर यांनी केले. आभार संस्थेचे अध्यक्ष अरुण खंजिरे यांनी मानले. यावेळी उपाध्यक्ष बाळासाहेब मुरदंडे, खजिनदार प्रदीप गोलंगडे, सचिव शेखर पाटील, संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : डॉ. अप्पासाहेब पवार व्याख्यानमालेत बोलताना डॉ. सी. आर. दास. शेजारी डावीकडून डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनीश पाटील.

# 'मराठेशाही साम्राज्य'वर शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर :** मराठ्यांनी महाराष्ट्राबाहेरील प्रांतात केलेल्या विस्ताराबद्दल अभ्यास व्हावा, अशी अपेक्षा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रा. डॉ. सी. आर. दास यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज अध्ययन केंद्र व इतिहास अधिविभागातर्फे डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत ते 'मराठेशाही साम्राज्य आणि राजकारण' विषयावर बोलत होते. विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर अध्यक्षस्थानी होत्या. इतिहास अधिविभागातील सभागृहात व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. यावेळी डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते. डॉ. नीलांबरी जगताप यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

Kolhapur, Kolhapur Today



मुरगूड (ता. कागल) येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात 'बहुसंस्कृती वाद' विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यासपीठावर डॉ. अर्जुन कुंभार, प्रा. अविनाश सप्रे, प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार, माजी प्राचार्य जीवन साळोखे, कार्यवाहक आण्णासो थोरवत, उपप्राचार्य डॉ. शिवाजीराव होडगे, आदी मान्यवर उपस्थित होते.

# जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत बहुसंस्कृतीचे संक्रमण : शिर्के

## मंडलिक महाविद्यालय : 'बहुसंस्कृती वाद' आंतरराष्ट्रीय परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुरगूड** : बहुसंस्कृती वादाचे सर्वांत महत्त्वाचे उदाहरण भारत असून, बहुसंस्कृतिक आणि बहुभाषिक रचना हे खऱ्या अर्थाने इतर संस्कृतीबाबतच्या सन्मानाचे आणि सहिष्णुतेचे आदर्श उदाहरण आहे. वेगवान वैज्ञानिक विकासाच्या आजच्या २१ व्या शतकाच्या टप्प्यावर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत हे बहुसंस्कृतीचे संक्रमण मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामध्ये सहिष्णुता हा पायाभूत घटक जिवंत असणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

मुरगूड (ता. कागल) येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात 'बहुसंस्कृती वाद' या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते.

परिषदेचे उद्घाटन प्रकुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार होते. तर डॉ. धनगे, प्रा. अविनाश सप्रे, प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार, माजी प्राचार्य जीवन साळोखे, कार्यवाहक आण्णासो थोरवत, उपप्राचार्य डॉ. शिवाजीराव होडगे, आदी प्रमुख उपस्थित होते.

यावेळी अर्जुन कुंभार म्हणाले, दिवंगत खासदार सदाशिवराव मंडलिक यांच्या प्रेरणेने मंडलिक महाविद्यालयात महत्त्वाच्या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद होत आहे. बहुसांस्कृतिक वाद ही अटळ बाब आहे. त्यापासून कोणतीही विद्याशाखा व कोणताही विषय अलिप्त राहू शकत नाही.

परिषदेत प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार यांचे बीजभाषण झाले. परिषदेला भारतातून सुमारे ३०० प्राध्यापक आणि संशोधक उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. अद्वैत जोशी यांनी केले. डॉ. टी. एम. पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. परिषद यशस्वी करण्यासाठी डॉ. उदय शिंदे, डॉ. टी. एम. पाटील, डॉ. ए. डी. जोशी यांनी समन्वयक म्हणून काम केले. प्रा. डॉ. उदय शिंदे यांनी आभार मानले.

पुढारी

# संमेलनामुळे वाङ्मयीन संस्कृतीबद्दल समाजात जिव्हाळा

## प्रा. रणधीर शिंदे यांचे मत; चिंचवाड येथे ग्रामीण युवा मराठी साहित्य संमेलन


**गांधीनगर : प्रतिनिधी**

ग्रामीण साहित्य संमेलनामुळे वाङ्मयीन संस्कृतीबद्दल समाजात जिव्हाळा निर्माण होत आहे. हे साहित्य चळवळीसाठी चांगले आहे, असे मत ज्येष्ठ समीक्षक व शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभागाचे प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

चिंचवाड (ता. करवीर) येथील दहाव्या ग्रामीण युवा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून डॉ. शिंदे बोलत होते.

डॉ. शिंदे म्हणाले, आपल्या परिसरातील वेगळेपण जपत साहित्य चळवळीतील आपल्या अस्तित्वाची जाण व्यक्त करून वाङ्मयीन संस्कृती प्रवाहित करण्याचे महत्कार्य ग्रामीण साहित्य संमेलनानी केले आहे. राष्ट्राच्या उभारणीत युवकांचे मोठे योगदान असते. साहित्य संमेलन ही चिंचवाड परिसरातील साहित्यरसिकांना मिळालेली अनोखी पर्वणी आहे.

यावेळी ज्येष्ठ ग्रामीण कथाकार शंकर पाटील, सृजनरत्न साहित्य पुरस्कार ज्येष्ठ कथाकार प्रा. व. बा. बोधे यांना देऊन, तर प्रा. कृष्णात खोत यांना साहित्यक्षेत्रातील जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबरोबर श्रेणिक पाटील, एम. डी. घुगरे, उत्तम पाटील, धनंजय इंगळे, चंद्रकांत बागने यांना सृजनरत्न शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले.



**चिंचवाड : येथे ग्रामीण युवा साहित्य संमेलनात बोलताना प्रा. रणधीर शिंदे. शेजारी राजाभाऊ शिरगुप्पे, डॉ. रावसाहेब पाटील, विजयकुमार बेळंकी, नीलम माणगावे आदी.**

रावसाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली 'साहित्य आणि आजची युवा पिढी' या विषयावर परिसंवाद झाला. त्यात प्रा. चंद्रशेखर कांबळे व लता आयवळे-कदम यांनी विचार मांडले.

तत्पूर्वी, मुकुंदकुमार कळमकर यांच्या हस्ते ग्रंथ दिंडीचे उद्घाटन झाले. कविवर्य विंदा करंदीकर मंडप प्रवेशद्वाराचे उद्घाटन अण्णासाहेब चौगुले यांच्या हस्ते, तर उत्तम तलवारे यांच्या महात्मा गांधी चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन सौ. नीलोफर शेख यांच्या हस्ते झाले. बाबा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन झाले. त्यात विजयकुमार बेळंके, दिनकर खाडे, विश्वास पाटील, दत्ता गुरव, सांची कांबळे, उमेश सुतार, के. ए. मगदूम आदी कवींनी रंगत आणली. 'जीवनासाठी साहित्य' हा परिसंवाद डॉक्टर रावसाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाला. शिक्षक वाचन कट्टातर्फे घेण्यात आलेल्या अभिनव वाचक स्पर्धेचे बक्षीस वितरण झाले. ज्येष्ठ कवी राजाभाऊ शिरगुप्पे यांनी मार्गदर्शन केले. रात्री सृजनच्या विशेष कार्यक्रमाने संमेलनाची सांगता झाली. यावेळी प्रमुख पाहुणे सुनीलकुमार लवटे यांचे भाषण झाले. 'सृजन वार्ता' या विशेषांकाचे प्रकाशनही झाले. भरत रसाळे, बाबा सरकार, सरपंच सुदर्शन उपाध्ये, दीपक मगदूम, उपसरपंच बाबुराव कोळी, किरणसिंह घाडगे, रामचंद्र नांद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. संयोजन संजय पाटील, नयना पाटील, रवींद्र खोत, रावसाहेब खोत, अण्णासाहेब पाटील व सृजन शक्ती परिवाराच्या सदस्यांनी केले. स्वागताध्यक्ष शीतल पाटील होते. संजय पाटील यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन उमेश सुतार व सुनीता पाटील यांनी केले. पद्मश्री पाटील यांनी आभार मानले.

पुढारी

# राज्य निवडणूक आयुक्त आज कोल्हापूर दौऱ्यावर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राज्याचे निवडणूक आयुक्त जे.एस.सहारिया मंगळवारी कोल्हापूर दौऱ्यावर येत आहेत. सकाळी सात वाजता त्यांचे रेल्वेस्थानकावर आगमन होईल. यानंतर ते शिवाजी विद्यापीठातील मान्यव्यशास्त्र सभागृहात सकाळी ११ वाजता होणाऱ्या 'भारतीय लोकशाहीची वाटचाल (१९५०-२०१९) या विषयांवरील कार्यशाळेत बीजभाषण करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असणार आहेत.

कार्यशाळेत पहिल्या सत्रात 'निवडणुका आणि आजचे वास्तव' या विषयावर किशोर रक्टे, दुसऱ्या सत्रात 'निवडणुका व भारतीय लोकशाही' या विषयावर प्रा. डॉ. प्रकाश पवार तर तिसऱ्या सत्रात 'भारतीय लोकशाहीची वाटचाल' या विषयांवर अशोक चौसाळकर बोलणार आहेत. कार्यशाळेनंतर सहारिया रात्री साडेआठ वाजता मुंबईला रवाना होणार आहेत.

सकाळ

# लोकशाहीच्या वाटचालीवर आज राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील नेहरू अभ्यास केंद्र व राज्यशास्त्र अधिविभाग आणि राज्य निवडणूक आयोगाच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय लोकशाहीची वाटचाल' (१९५९-२०१९) या विषयावर मंगळवारी (ता. ५) एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र होत आहे. राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त जे. एस. सहारिया याची प्रमुख उपस्थिती असणार आहे. मानव्यशास्त्र सभागृहात सकाळी अकरा वाजता त्यास सुरुवात होईल. श्री. सहारिया, किशोर रक्टटे, प्रा. डॉ. प्रकाश पवार, प्रा. डॉ. अशोक चौसाळकर यांचे बीजभाषण होणार आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
05/03/2019 Page No. 1



# शिवाजी विद्यापीठात उद्या परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. ६) 'इमर्जिंग ट्रेंडस ॲण्ड टेक्नॉलॉजीज् इन लायब्ररी ॲण्ड इन्फॉर्मेशन सायन्स' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. विविध मान्यवर यावेळी मार्गदर्शन करणार आहेत.

या परिषदेसाठी वरील विषयाच्या अनुषंगाने देशभरातून विविध ८७ संशोधन लेख प्राप्त झाले आहेत. तरी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र क्षेत्रातील सर्व व्यक्तींनी या राष्ट्रीय परिषदेचा लाभ घ्यावा, असे आव्हान डॉ. एन. बी. खोत, संचालक ज्ञान स्रोत केंद्र तथा परिषद संयोजक व डॉ. शालिनी आर. लिहितकर, विभागप्रमुख ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग यांनी केलेले आहे.


लोकमत

# ओडिशातील विस्तारामध्ये रघुजी भोसले यांची महत्त्वाची भूमिका : सी. आर. दास

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : नागपूरकर भोसले यांनी ओडिशा प्रांतामध्ये मराठा साम्राज्याचा विस्तार केला. त्यामध्ये रघुजी भोसले यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील डॉ. सी. आर. दास यांनी शनिवारी (दि. २) येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील छत्रपती



शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्र आणि इतिहास अधिविभाग यांच्यामार्फत आयोजित डॉ. अप्पासाहेब पवार स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते. इतिहास अधिविभागाच्या सभागृहातील या व्याख्यानात त्यांनी 'ओडिशा प्रांतातील मराठा राजकारण - १७९१ ते १८०३' या विषयावर विचार मांडले. अध्यक्षस्थानी इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, तर डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते.

डॉ. नीलांबरी जगताप यांनी स्वागत केले. प्रा. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.

Kolhapur Main
Page No. 4 Mar 04, 2019
Powered by: erelego.com